# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय:- नवीवस्ती मुंबई महानगरपालिका पाईप लाईनच्या बाजुला सुपर डिलक्स/आकांक्षी शौचालय (बी.ओ.टी.) तत्वावर बांधणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१४ मधील पाईपलाईन मेनरोड, मच्छी मार्केट याठिकाणी मनपाचे ३४ सीटचे शौचालय असुन आजमितीस उक्त ठिकाणी नवीन कॉंक्रिट रस्त्याचे काम सुरु असुन सदरील शौचालय रस्त्यात बाधित होत आहे. त्यामुळे रस्त्यात बाधित होत असलेले शौचालय निष्कासित करणे गरजेचे आहे. परिणामी शौचालय निष्कासित केल्यामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय होणार असल्याने पर्यायी व्यवस्था म्हणुन बृहन्मुंबई मनपाच्या रस्त्याच्या दुस-या बाजुस नवीन शौचालय बांधणे करिता उपलब्ध करणे जागा कामी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पत्राव्दारे मागणी केली आहे. तसेच मा.आमदार श्री.रईस कासम शेख यांनी देखील मागणी केली आहे.

तरी उक्त ठिकाणी नवीन डिलक्स सेवा युक्त आकांक्षी शौचालय "**बांधा, वापरा व हस्तांतरित करा**" (बी.ओ.टी.) या तत्वावर बांधणे कामी जनकल्याण सोशल ॲण्ड वेलफेअर सोसायटी, कुर्ला (पुर्व) मुंबई यांनी तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे भिवंडी महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेवर सदरील नविन शौचालय बांधण्याकरिता येणारा आर्थिक बोजा पडणार नाही. सदर ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर शौचालय बांधणेकरिता ८.० x ८.० मी. इतके जागा उपलब्ध करुन दयावी व शौचालय इमारत बांधणे कामी आवश्यक असलेल्या जागेचा मोबदला सदरील इच्छुक संस्था देण्यास तयार आहे. एकंदरित तळ एक मजल्याचे ३४ सीटचे शौचालय/बाथरुम व मुतारी इमारती बांधकामाकरिता ५५ ते ६० लाख इतका खर्च होणार आहे. याकामी बांधा-वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर शौचालय बांधणेकरिता जनकल्याण सोशल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, कुर्ला (पुर्व) मुंबई तयारी दर्शवली आहे त्यामुळे मनपावर याचा आर्थिक बोजा पडणार नसुन नागरिकांना सोयी पुरविता येईल. तसेच या शौचालय इमारतीच्या बांधकाम करिता जवळपास ८.० x ८.० मी. इतकी जागा आवश्यक असुन जागा मिळणे करिता भिवंडी मनपा मार्फत वारंवार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मागणी केली असता बृहन्मुंबई मनपा यांचेकडील दि.१०/०५/२०२४ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी भिवंडी मनपास मत्ता रक्कम व वार्षिक भुईभाडे आकारण्याच्या अटीवर भिवंडी मनपास जागा देण्यास तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार मनपास आकारण्यात आलेली मत्ता रक्कम रु.६,२४,८००/- इतकी रक्कम व वार्षिक भाडे रु.७१/-संस्थेमार्फत दि.02/08/2024 रोजी मनपा फंडामध्ये भरणा करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दि.19/08/2024 रोजी जमा केला आहे. त्यामुळे भिवंडी मनपावर आर्थिक बोजा पडणार नसुन नागरिकांकरिता सुलभ असे शौचालय उपलब्ध होऊ शकेल.

ठराव क्र. ७०९ दिनांक :-१९/१२/2024

नवीवस्ती मुंबई महानगरपालिका पाईप लाईनच्या बाजुला सुपर डिल्क्स/आकांक्षी शौचालय (बी.ओ.टी.) तत्वावर बांधणे कामी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे बृहन्मुंबई मनपा यांचेकडील दि.१०/०५/२०२४ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी भिवंडी मनपास मक्ता रक्कम व वार्षिक भुईभाडे आकारण्याच्या अटीवर भिवंडी मनपास जागा देण्यास तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार मनपास आकारण्यात आलेली मक्ता रक्कम रु.६,२४,८००/- इतकी रक्कम व वार्षिक भाडे रु.७१/- संस्था भरण्यात तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे भिवंडी मनपावर आर्थिक बोजा पडणार नसुन नागरिकांकरिता सुलभ असे शौचालय उपलब्ध होऊ शकेल.

त्यास शहर अभियंता, तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी प्रस्तावास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका